


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६४८. वा | गुरुवार | दि. ११ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जिल्हाधिकारी महोदय जिल्ह्यातील भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई कधी करणार?

## महसूल विभागापासून जिल्हा रुग्णालयापर्यंत भ्रष्टाचाराचे लोण...

## पूर्वीच्या जिल्हाधिकाऱ्यांची निष्क्रिय शैली पुन्हा चालणार का, अनेकांना प्रश्न

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात सध्याच्या घडीला विविध शासकीय कार्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळल्याचे दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने आतापर्यंत पूर्णपणे उघड केलेले आहे. महसूल विभाग असो की, आरोग्य विभाग सगळीकडे भ्रष्टाचाराचा भस्मासूर थैमान घालतो आहे. या सर्व भ्रष्टाचारावर विद्यमान जिल्हाधिकारी किरण पाटील हे प्रत्यक्ष कठोर कारवाई करणार आहेत की, हा भ्रष्टाचार असाच सुखेनैव चालू राहणार आहे, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. हा प्रश्न उपस्थित होण्याचे मुख्य कारण म्हणजे महसूल विभागात कार्यरत महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय टेकाळे आणि भ्रष्टाचारी तहसीलदार रुपेश खंडारे हे तर खुद्द जिल्हाधिकाऱ्यांच्याच महसूसल विभागात काम करतात, परंतु त्यांच्यावर अद्यापही म्हणावी तशी कारवाई झालेली नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने महसूल विभागात जो काही भ्रष्टाचार बोकाळला आहे, त्यावर प्रकाश टाकण्याचे काम करीत आहे. एव्हढेच नाहीतर महसूल विभागात राहून एकीकडे सरकार चुना लावणे, अनिर्बंध भ्रष्टाचार करणे व त्यातून स्वःच्या प्रचंड अवैध संपत्ती / अपसंपदा जमा करणाऱ्यांची संपूर्ण माहिती पुराव्यांनिशी अधिकाऱ्यांना देण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करीत आहे. पूर्वीचे जिल्हाधिकारी तुम्मोड हे असताना त्यांनाही यासंदर्भात माहिती देण्यात आली होती. मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हा महसूल विभागात कार्यरत मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यासारख्या महाभ्रष्ट अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई होताना दिसून येत नाही. विजय टेकाळे हे महसूल विभागातील एक असे व्यक्तिमत्व बनले आहे की, त्यांच्यावर कारवाई करायला उपविभागीय अधिकारी असो की निवासी उपजिल्हाधिकारी कोणीही कारवाई करीत नाही. एव्हढेच नाही तर त्यांची साधी बदली करण्यासाठीही पूर्वीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी चक्क महसूल आयुक्तांकडे परवानगी मागितली होती. दुसरीकडे टेकाळे यांनी आजवर जो काही बेबंद भ्रष्टाचार केला, त्यातून जी कोट्यवधी रुपयांची अवैध संपत्ती / अपसंपदा जमा केली, त्यासंदर्भातही त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. बाकी अधिकाऱ्यांचे तर सोडाच परंतु जिल्हाधिकारी देखील त्यांच्यावर आजवर कारवाई करू शकलेले नाहीत. यावरून हे स्पष्ट आहे की, टेकाळे हे संघटना आणि राजकीय क्षेत्रातील लोकांचा दबाव प्रशासनावर आणतात. त्यामुळेच त्यांच्यावर कारवाई होत नाही. आधीचे जिल्हाधिकारी तुम्मोड यांनी तर आपल्या अख्ख्या कार्यकाळात टेकाळेंवर कारवाई करण्याची हिम्मतच दाखवली नाही. काही महिन्यांपूर्वी जिल्ह्यात किरण पाटील हे जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाले. किरण पाटील हे निर्भिडपणे काम करणारे अधिकारी असल्याची त्यांची ख्याती आहे. मात्र, गेल्या चार-पाच महिन्यांच्या कालावधीत त्यांच्याकडून टेकाळे यांच्यासारख्या भ्रष्टाचाऱ्यांवर कोणतीही कारवाई झालेली नाही. एव्हढेच नाही जेंव्हा सिटी नतुज व दैनिक जनसंचलनच्या वतीने टेकाळे व तहसीलदार खंडारे यांच्या भ्रष्टाचाराविषयी थेट महसूल आयुक्तांकडे तक्रार केली, त्या वेळी महसूल आयुक्त कार्यालयातून कारवाई करण्यासंदर्भात आदेश जिल्हाधिकारी किरण पाटील यांना पाठवण्यात आले. परंतु गेल्या महिनाभरात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महसूल उपायुक्तांच्या आदेशाला अक्षरशः केराची टोपली दाखवण्यात आली आहे.कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी किरण पाटील हे मुरलेले अधिकारी आहेत. त्यांचा प्रशासनिक अनुभव देखील दांडगा आहे.

उर्वरित पान ८ वर

### ...बोकाळलेला भ्रष्टाचार...

**जिल्हा सामान्य रुग्णालयातील तत्कालीन रोखपाल पी. के. माळी यांच्या विषयी जिल्हा सामान्य रुग्णालयातून शहर पोलिसात पत्र व्यवहार तर रोखपाल आर.एस.लाकडे यांची माहिती गुलदस्त्यात करोडो रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणात या दोन कड्या उघडल्या की सर्व भ्रष्टाचार व तत्कालीन अधिकाऱ्यांच्या भानगडी समोर येण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.**




नेहमी चर्चेत असणारे मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे बडतर्फ प्रकरण

**टेकाळेंची बदली नको, बडतर्फीच हवी :तक्रारकर्त्यांची मागणी**

# मेरा खुर्द येथे अवैध धंदाचा सुळसुळाट वरली मटका त्वरित बंद करा.

**जनसंचलन/ चिखली**

तालुक्यातील मौजे मेरा खुर्द येथे अवैध धंदाचा सुळसुळाट झाला आहे या ठिकाणी रहदारीची खूपच गर्दी असते या ठिकाणाहून जगप्रसिद्ध लोणार सरोवर तसेच मराठवाड्यातील जाफराबाद चिखली व संभाजीनगर या ठिकाणी येणे जाण्यासाठी या ठिकाणी प्रवाशांची भरपूर वर्दळ असते परंतु या ठिकाणी काही दिवसापासून अवैध धंद्याने डोके वर काढले आहे या ठिकाणी भरोसा येथील शिवशंकर विद्यालय सुद्धा आहे या ठिकाणी सुद्धा बाहेरगावावरून मुले मुली शिक्षणासाठी येतात परंतु या ठिकाणी अवैधंद्याने आपली मुळे चांगलेच खोलवर पोहोचवली असल्यामुळे या ठिकाणी अवैध वरली मटका तसेच अवैद्य देशी दारू पिऊन परिसरामध्ये लोक धिंगाणा घालतात त्याचा परिणाम शाळकरी विद्यार्थ्यांवर सुद्धा दिसून येत आहे या ठिकाणी चंदनपुर मेरा बुद्रुक अंत्री खेडेकर असोला भरोसा रामनगर रोहड इत्यादी गावातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात परंतु या ठिकाणी अवैध वरली व देशी दारू यांचा सुळसळट असल्यामुळे या ठिकाणी विद्यार्थ्यांवर यांचा वाईट परिणाम दिसून येत आहे या अवैद्य धंद्यामुळे मुलांच्या शिक्षणावर वाईट परिणाम होताना दिसून येत आहे या यापूर्वी या ठिकाणी मेरा खुर्द येथे काही वाईट गोष्टी घडल्या आहेत त्या मुळे या ठिकाणी पुलिस चौकी सुद्धा सुरू केली होती परंतु आता चौकी सुद्धा दिसीनासी झाली आहे या ठिकाणी काही दिवस पूर्वी मेरा खुर्द येथील ग्रामपंचायत कार्यालय यांनी यांनी अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांना अवैध धंदे बंद करण्याचा ग्रामपंचायतचा ठराव दिला होता त्यामुळे येथील वरली मटका हा बंद झाला होता परंतु काही दिवसापूर्वी परत या ठिकाणी वरली मटक्याने आपले डोके वर काढले आहे त्यामुळे येथील तरुण हे वामार्गाकडे चालले आहे तसेच या धंद्यामुळे शाळेतील विद्यार्थी सुद्धा वरली मटका कडे वळले आहे याची दखल घेऊन मेरा खुर्द येथील सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बुलढाणा ओ बि सी सेलचे जिल्हा सचिव नदीम भाई देशमुख



व दमुदा वाघमारे महेंद्र वाघमोडे यांनी अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांना एक निवेदन दिले आहे सदर वरली मटका व अवैद्य धंदे याकडे अंढेरा पुलिस स्टेशनचे ठाणेदार यांनी लक्ष देण्याची गरज आहे सदर निवेदनाची प्रति सिंदखेडराजा मतदारसंघाचे आमदार डॉक्टर राजेंद्र शिंगणे साहेब व बुलढाणा जिल्हा अधिक्षक साहेब यांच्या कडे दिले आहे

# दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना पाच रूपये अनुदानाचा लाभ...



जनसंचलन/बुलढाणा

राज्यातील सहकारी संघ आणि खासगी दुध प्रकल्पांना दुध पुरवठा करणाऱ्या दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुधासाठी प्रतिलिटर ५ रूपये अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी राज्यातील सहकारी दुध संघ आणि खासगी दुध प्रकल्पांनी आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मुंबई यांच्याकडे अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शासनाने जाहिर केलेल्या ५ रूपये प्रतिलिटर दुधास अनुदान योजनेत सहभागी होण्यासाठी सहकारी संघ आणि खासगी दुध प्रकल्पांनी विहीत नमुन्यात अर्ज करावे लागणार आहे. या योजनेत सहभागी होणाऱ्या सहकारी दुध संघ आणि दुध प्रकल्पांनी डीबीटी करण्यासाठी दुध उत्पादक शेतकऱ्यांचे बँक खाते त्यांचा आधार कार्ड आणि पशुधनाच्या कानातील बिल्याशी संलग्न करणे आवश्यक आहे. या योजनेत दुध उत्पादक शेतकरी दुध संघ, खासगी प्रकल्पास दुध पुरवठा करतात ते शेतकरी सहकारी संघ, खासगी प्रकल्पामार्फत सहभागी होवू शकतात. या योजनेचा कालावधी दि. ११ जानेवारी २०२४ ते दि. १० फेब्रुवारी २०२४ असा आहे. या योजनेत सहभागी होणाऱ्या सहकारी संघ, खासगी प्रकल्पांनी आपला स्वतंत्र अर्ज उपरोक्त माहितीसह . या ई-मेल आयडीवर पाठवावेत, असे आवाहन जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी डॉ. डी. एन. काळे यांनी केले आहे.

# दिव्यांग व्यक्तींनी बिजभांडवल योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन




जनसंचलन/बुलढाणा

दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियान शिबीरामध्ये बिजभांडवल योजनेसाठी मागणी नोंदविलेल्या दिव्यांग व्यक्तींनी परिपूर्ण अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियान शिबीरामध्ये दिव्यांग व्यक्तींनी जिल्हा परिषदेच्या जिल्हा समाज कल्याण विभागाकडून लघु उद्योगासाठी वित्तीय सहाय्य योजना दिव्यांग बिजभांडवल या योजनेकरीता मागणी नोंदविलेली आहे, अशा दिव्यांग व्यक्तींनी दिव्यांग बिजभांडवल योजनेचा परिपूर्ण अर्ज भरावा. तसेच सोबत परिपूर्ण कागदपत्रे जोडावीत. सदर अर्ज दि. २५ जानेवारी २०२४ पर्यंत जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी मनोज मेरत यांनी केले आहे.

# मनुष्यबळाच्या सांख्यिकीय माहितीचे विवरणपत्र

## ३१ जानेवारीपर्यंत सादर करण्याचे आवाहन...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रातील सर्व आस्थापनांना सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणे) कायदा १९५९ व नियम १९६० च्या कलम ५ (१) अन्वये मनुष्यबळाचा सांख्यिकीय माहितीचे त्रैमासिक विवरणपत्र दि. ३१ जानेवारी २०२४ पर्यंत सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाने विकसित केलेल्या .. या वेबपोर्टलवर रोजगारविषयक सेवा ऑनलाइन पद्धतीने देण्यात येत आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र या कार्यालयाकडे नोंदणीकृत सर्व शासकीय निमशासकीय कार्यालये, आस्थापना, तसेच अनुदानित, विनाअनुदानित शाळा, महाविद्यालयांनी सेवायोजन कार्यालये रिक्तपदे अधिसुचित करणे सक्तीचे कायदा १९५९ नुसार त्रैमासिक विवरण पत्र (ईआर-१) ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. सदर सुविधा .. या वेबपोर्टलवर उपलब्ध आहे. माहे डिसेंबर २०२३ चे त्रैमासिक विवरण पत्र (ईआर-१) दि. १ जानेवारी २०२४ पासून दि. ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावे, ऑनलाईन त्रैमासिक विवरण पत्र (ईआर-१) भरण्यास अडचण निर्माण झाल्यास जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राशी प्रत्यक्ष संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आज महा-६० कार्यक्रमाचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

डिस्ट्रीक्ट आऊटरिच प्रोग्राम अंतर्गत महा ६० कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या दि. ११ जानेवारी २३०२४ रोजी सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. उद्योग संचालनालयाकडून उद्योजकता विकासाबाबत जागरुकता वाढवण्यासाठी आणि जिल्ह्यात उद्योजकतेची परिसंस्था निर्माण करण्यासाठी डिस्ट्रीक्ट आऊटरिच प्रोग्राम महा-६० कार्यक्रम बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यात गुरुवार, दि. ११ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १० वाजता राजर्श्री शाहू कॉलेज, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, एक्सईडी डेव्हलपमेंट लिमिटेडचे कार्यकारी संचालक संदेश कांबळे, डॅडी चिप्सचे मनोज बुरड, आयडीबीआय कॅपिटलचे मुकुंद तिवारी, राजर्षी शाहू कॉलेजचे प्राचार्य शिरीश जैन, बाबला ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे सादिक बाबला, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सुनिल पाटील, व्यवस्थापक एन. एस. पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

# कोव्हिड काळातील कर्मचाऱ्यांचे थकित मानधन मिळण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषण...

## लवकरात लवकर मागणी मान्य न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय समोर आत्मदहन करण्याचा दिला इशारा




जनसंचलन/बुलढाणा

कोविड काळात जिवाची परवा न करता काम करणाऱ्या कोविड योध्दा कर्मचारी यांच्यावर आज उपासमारीची वेळ आली आहे. हि गंभीर बाब असतांना प्रशासन त्यांच्याकडे दुर्लक्ष करित असल्याचे दिसून येत आहे.कोविड काळात कुठल्याही गोष्टीची त्यांनी परवा केली नाही. अहोरात्र रूग्णांना त्यांनी सेवा दिली आहे.मात्र आज त्यांच्यावर अन्याय होताना दिसून येत आहे.जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय बुलढाणा यांचे अधिनस्त असलेल्या आरोग्य विभागात कंत्राटी पध्दतीने तयांनी विविध ठिकाणी सेवा दिली आहे.मात्र त्यांना कोणतीच पूर्वसूचना न देता आणि उदरनिर्वाहाचा विचार न करता कामावरून सुध्दा त्यांना कमी करण्यात आले आहे. संपूर्ण जगभर कोरोना या संसर्गजन्य आजाराचा प्रार्दुभाव वाढल्याने रूग्णांच्या आरोग्याच्या दृष्टीने रूग्णास सोयी सुविधा पुरविणे साठी कोरोना काळात दि १ एप्रिल २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीतील पारश्रमीक मानधन मोबदला पगार अजून दिलेला नाही आहे. वारंवार सदरहू थकीत मानधन मिळणेबाबत तोंडी स्वरूपात व त्यानंतर लेखी स्वरूपात मा.जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय बुलढाणा यांचेकडे विचारणी केली असता वेळोवेळी उडवाउडवीचे उत्तरे मिळाली आहे.त्यामुळे आता कोविड काळात कोविड योध्दा असलेल्या कर्मचारी यांच्यावर उपासमारीचे वेळ आली आहे.लवकरात लवकर कोविड काळातील थकीत मानधन मिळण्यात यावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषणासाठी आरोग्य कंत्राटी कर्मचारी बसलेले आहे. लवकरात लवकर आमच्या मागण्या मान्य न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय समोर सामुहिक आत्मदहन करू असा इशारा सुध्दा उपोषण कर्ते यांनी दिली आहे.गजानन सावरकर,विजय चव्हाण,संदीप पवार या तिघांनी हि उपोषणाची तळ ठोखलेली आहे तर इतर कर्मचारी यांनी त्यांना पाठिंबा दिला आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# सकस अन कसदार निर्मितीवर मंत्रिमंडळाची मोहर...

## सत्यशोधक चित्रपट टॅक्स फ्री हा बुलढाण्याच्या मातीचा सन्मान




जनसंचलन /बुलढाणा

चित्रपट निर्मिती क्षेत्र पुण्या मुंबईचे,असे बोलले जाते. बुलढाणा हे तसे आडवळणाचे गाव. परंतु बुलढाण्याच्या मातीतील भूमिपुत्र सुनील शेळके यांनी या क्षेत्रामध्ये टाकलेलं पाऊल अन त्यांच्या टीमची पहिलीच निर्मिती असलेला सत्यशोधक चित्रपट प्रदर्शनानंतर अवघ्या काही दिवसात टॅक्स फ्री करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज हा माध्यमातून सध्या ते उद्योग व्यवसायाशी निगडित आहे. सत्यशोधक हा चित्रपट प्रदर्शनांतर काही दिवसातच टॅक्स फ्री करण्यात आला आहे. राज्यातील सर्व चित्रपट गृहामध्ये तो सध्या झळकत आहे. याला मोठा प्रतिसाद देखील मिळत आहे. सर्वसामान्य लोकांनी हा चित्रपट बघावा अशी मोहरच राज्य सरकारने चित्रपट टॅक्स फ्री करून उमटवली आहे. याबद्दल बुलढाण्यात आनंद व्यक्त करण्यात आला.

निर्णय घेण्यात आला. याबद्दल बुलढाणेकरांनी आनंद व्यक्त करीत हा बुलडाण्याच्या मातीचा सन्मान असल्याचे म्हटले आहे. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांची संघर्ष गाथा रुपेरी पडद्यावर आणण्याच काम सत्यशोधक चित्रपटाच्या माध्यमातून सुनील शेळके आणि सत्यशोधकच्या टीमने केले. सुनील शेळके चळवळीच्या मुशीतून आलेलं व्यक्तिमत्व. प्रशासनातील वरिष्ठ पदावर पोहोचले तरी विचारांची नाळ त्यांनी कधी तुटू दिली नाही.अभिता कंपनीच्या

### खूप दिवसानंतर आली अशी निर्मिती...

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवन चरित्रावरील चित्रपट पाहून अक्षरशः भारावून गेलो. खूप सुंदर चित्रण करण्यात आले आहे. फुले दाम्पत्याचे कार्य इतिहासात घडले ते प्रत्यक्ष थिएटरमध्ये पाहताना इतिहास पुन्हा डोळ्यापुढे उभा राहतो. ही सुंदर कलाकृती टॅक्स फ्री झाल्याने हा चित्रपट लोकांनी आवर्जून बघावा अशी शासनाची सुद्धा इच्छा दिसत आहे.

**सुरेश देवकर अध्यक्ष आदिती अर्बन**

### शासनाचे खुप खुप आभार...

सत्यशोधक चित्रपट टॅक्स फ्री होईल, असा विचारही केला नव्हता. मंत्री छगन भुजबळ यांनी हा विषय कॅबिनेटमध्ये उपस्थित केला. त्याला सर्व मंत्र्यांनी अनुमोदन दिले. विशेषतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अमोल मिटकरी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार.

**सुनिल शेळके निर्माता, सत्यशोधक**

### फुले दाम्पत्याच्या कार्याला उजाळा...

छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास लोकांना जो काही माहीत होता तो अर्धवट होता. जेव्हा डॉ. अमोल कोल्हे यांनी यावर निर्मिती केली तेव्हा खरा इतिहास लोकांना कळला. चित्रपट हे खूप मोठे माध्यम आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांचे कार्य खूप महान आहे. यावर निर्मिती करून हा चित्रपट प्रेक्षकांपर्यंत आणण्याचे मोठे काम झाले आहे. सर्व महिलांनी हा चित्रपट बघावा असा आहे. शासनाच्या निर्णयाचे खूप खूप आभार.

**डॉ मनोहर तुपकर मराठा सेवा संघ**

# राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त सिंदखेड राजा येथे शुक्रवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन

## सहकार तथा पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते होणार उद्घाटन...

जनसंचलन/बुलडाणा

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार (दि. १२) रोजी सकाळी ९ वाजता सिंदखेड राजा येथे राज्याचे सहकार मंत्री तथा पालकमंत्री दिलीप वळसे-पाटील आणि वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच राजमाता जिजाऊ यांच्या टपाल तिकिटाचे अनावरण करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. दरवर्षी राजमाता जिजाऊ यांची जयंती सिंदखेड राजा येथील त्यांचे जन्मस्थळ असलेल्या राजे लखोजी जाधव राजवाडा येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. यावर्षी राजे लखोजी जाधव राजवाडा येथे पालक मंत्री श्री. वळसे पाटील आणि सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात येणार असून, पंचायत समिती



प्रांगणात राजमाता जिजाऊ यांच्या टपाल तिकिटांचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला बुलडाण्याचे खासदार प्रतापराव जाधव आणि रावेरच्या खासदार श्रीमती रक्षा खडसे, सर्वश्री आमदार किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धिरज लिंगाडे, डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ. संजय कुटे, संजय रायमुलकर, अॅड. आकाश फुंडकर, संजय गायकवाड, आमदार श्रीमती श्वेताताई महाले, आमदार राजेश एकडे, सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिव श्रीमती जयश्री भोज, छत्रपती संभाजीनगर क्षेत्राचे पोस्ट मास्टर जनरल अदनान अहमद आणि जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे, नगराध्यक्ष सतीश तायडे आणि पुरातत्व व वस्तुसंग्रहालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांनी केले आहे.

# नेहरू युवा केंद्रातर्फे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न...



जनसंचलन/बुलढाणा

नेहरू युवा केंद्र आणि जिजामाता महाविद्यालयाच्या वतीने मेरा भारत - विकसित भारत २०४७ या विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा मंगळवार, दि. ९ जानेवारी २०२४ रोजी जिजामाता विद्यालयात पार पडली. आमदार संजय गायकवाड उद्घाटक म्हणून उपस्थित होते. जिजामाता महाविद्यालयातील कला शाखेचे प्रमुख डॉ. जे. जे. जाधव अध्यक्षस्थानी होते. यावेळी ओमसिंग राजपूत, नेहरू नेहरू युवा केंद्राचे लेखा व कार्यक्रम पर्यवेक्षक अजयसिंग राजपूत, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. डी. जे. कांदे, गजेंद्र दांडगे उपस्थित होते. आमदार श्री. गायकवाड यांनी जिल्ह्यात शिक्षणाच्या सोयीसुविधा निर्माण करण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच शिक्षणापासून वंचित राहू यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. शिक्षणासोबतच शहराचा विकास करण्यात येत आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांक श्रुती दिलीप तायडे, द्वितीय क्रमांक प्रांजल मेरसिंग जाधव, तृतीय क्रमांक ऋतुजा कैलास पवार, प्रोत्साहनपर सुयोग विजय शेळके यांनी बक्षीस पटकविले. त्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले. परीक्षक म्हणून यशवंत अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. जयकुमार गवई, नजीम खान पठाण, प्रा. अभिजीत वडाळकर यांनी काम पाहिले. राष्ट्रीय युवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. जे. कांदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रूपाली हिवाळे यांनी सूत्रसंचालन केले. अजयसिंग राजपूत यांनी आभार मानले. यावेळी अजय समाधान वानखेडे यांच्या बासरी वादनाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख प्रा. पवन ठाकरे, नेहरू युवा केंद्राचे धनंजय चाफेकर, विलास सोनोने यांनी पुढाकार घेतला.

# शिंदे गट हिच खरी शिवसेना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा निकाल...

वृत्तसंस्था/मुंबई

महाराष्ट्रच नव्हे, तर अवघ्या देशाचं लक्ष लागून राहिलेल्या शिव-सेना आमदार अपात्रता प्रकरणाच्या निकालाचे वाचन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जवळपास ४० मिनिटे उशिराने सुरु केले. मूळ शिवसेना पक्ष म्हणून एकनाथ शिंदे गटाला मान्यता देत असल्याचं सांगत राहुल नार्वेकरांनी उद्धव ठाकरेंना मोठा धक्का दिला आहे. त्याचप्रमाणे शिंदे समर्थक १६ आमदारांना अपात्र ठरवण्याची मागणी करणारी याचिकाही फेटाळली. एकनाथ शिंदे यांच्याकडे ३७ आमदार होते, भरत गोगावले हे अधिकृत प्रतोद आहेत, असं राहुल नार्वेकरांनी सांगितलं. शिवसेना पक्षप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे एकटे गटनेत्याला पदावरुन काढू शकत नाहीत. शिवसेनेच्या घटनेनुसार राष्ट्रीय कार्यकारिणीला अंतिम निर्णयाचे अधिकार आ-हेत. पक्षप्रमुखाला सर्वोच्च अधिकार देणं हे लोकशाहीसाठी घातक आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांची केलेली हकालपट्टी अमान्य आहे, असं राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केलं. दोन्ही पक्षांनी (शिवसेनेचे दोन गट) निवडणूक आयोगाला सादर केलेल्या घटनेवर एकमत नाही. नेतृत्व रचनेबाबतही दोन्ही पक्षांची मते भिन्न आहेत. त्यामुळे एकमेव पैलू म्हणजे विधिमंडळ पक्षातील बहुमत. वादाच्या आधी अस्तित्वात अस-लेली नेतृत्व रचना लक्षात घेऊन संबंधित घटना मला ठरवावी लागेल.शिवसेनेची २०१८ ची सुधारित घटना वैध मानली जाऊ शकत नाही, कारण ती भारतीय निवडणूक आयोगाच्या नोंदीमध्ये नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, मी इतर कोणत्याही घटकाचा आधार घेऊ शकत नाही. नोंदीनुसार, मी वैध संविधान म्हणून शिवसेनेच्या १९९९ च्या घटनेचा आधार घेत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, दोन्ही गटांनी संविधान पक्षाच्या वेगवेगळ्या आवृत्त्या सादर केल्या आहेत. अशा परिस्थितीत दोन गट उदयास येण्यापूर्वी दोन्ही पक्षांच्या संमतीने निवडणूक आयोगाकडे सादर झालेली घटना विचारात घेतली पाहिजे. महाराष्ट्र विधानसभा सचिवालयाने ७ जून २०२३ रोजी एक पत्र दिले होते, ज्यामध्ये निवडणूक आयोग कार्यालयाला पक्षाच्या घटनेची/नियमांची प्रत प्रदान करण्याची विनंती केली होती. खरा राजकीय पक्ष कोणता गट आहे, हे ठरवण्यासाठी आयोगाने दिलेली शिवसेनेची घटना ही शिवसेनेची संबंधित घटना आहे.दहाव्या परिशिष्टानुसार मला केवळ राजकीय नेतृत्व पाहायचं आहे. उलटतपासणीला न आल्यामुळे ठाकरे गटाचं प्रतिज्ञापत्र अमान्य करण्यात आलं आहे. माझ्यासमोरील पुरावे आणि नोंदी पाहता, प्रथमदर्शनी असे सूचित होते की २०१३ आणि २०१८ मध्ये पक्षात कोणत्याही निवडणुका झाल्या नाहीत. तथापि, मी १० व्या अनुसूची अंतर्गत अधिकार क्षेत्राचा वापर करताना त्यापलिकडे जाऊ शकत नाही. आयोगाचे रेकॉर्ड संकेतस्थळावर उपलब्ध आहेत आणि म्हणूनच मी संबंधित नेतृत्व रचना ठरवताना या पैलूचा विचार केला नाही.




अशाप्रकारे, वरील निष्कर्ष लक्षात घेता, मला असे आढळून आले आहे की निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ च्या पत्रात प्रतिबिंबित झालेली शिवसेनेची नेतृत्व रचना ही कोणता गट खरा पक्ष आहे, हे ठरवण्याच्या उद्देशाने विचारात घेणे आवश्यक आहे. शिवसेना पक्षप्रमुख एकटे गटनेत्याला पदावरुन काढू शकत नाहीत. शिवसेनेच्या घटनेनुसार राष्ट्रीय कार्यकारिणीला अंतिम निर्णयाचे अधिकार आहेत. पक्षप्रमुखाला सर्वोच्च अधिकार देणं हे लोकशाहीसाठी घातक आहे. अन्यथा छोट्या घटकांसह कोणीच पक्षप्रमुखांविरोधात बोलू शकणार ना-हीत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांची केलेली हकालपट्टी अमान्य आहे, असं राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केलं.

## सत्यशोधकची टीम जिजाऊंच्या दर्शनाला...

## सिंदखेडराजा वासीयांच्या वतीने होणार नागरी सत्कार

जनसंचलन/ सिंदखेडराजा



क्रांतिसूर्य महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित सत्यशोधक चित्रपटाची टीम १२ जानेवारी रोजी सिंदखेड राजा येथे राष्ट्रमाता जिजाऊंच्या दर्शनाला येणार आहे. यावेळी शहरवासीयांच्यावतीने या टीमचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. समता फिल्म आणि अभिता फिल्मच्या वतीने ५ जानेवारी रोजी सत्यशोधक चित्रपट संबंध महाराष्ट्रभर प्रदर्शित झालेला आहे. महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले यांचे सामाजिक, शैक्षणिक कार्य आणि आनंदमय सहजीवन पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर आले आहे. राज्यभर सत्यशोधक सिनेमाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महिला, युवक, विद्यार्थी, व्यावसायिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी हा चित्रपट बघितला आहे. इतरांनी सुद्धा हा चित्रपट बघावा याकरिता आवाहन केले आहे.

१२ जानेवारीला जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त सत्यशोधकची टीम मातृतीर्थ नगरीत येत आहे. चित्रपटाचे संकल्पक राहुल तायडे, दिग्दर्शक नीलेश जळमकर, निर्माते सुनिल शेळके, ज्योतिबांच्या बालपणीच्या भूमिकेतील प्रथमेश पांडे , सावित्रीबाईंच्या बालपणीच्या भूमिकेतील समृद्धी सरवार, उस्मान शेख, फातिमा शेख यांच्या भूमिकेतील मोनिका तायडे कलाकारांसह तुकाराम बिडकर , नीता खडसे, कांचन वानखेडे, किरण डोंगरे, सीमा जाधव , सह निर्माता राहुल वानखेडे, सह निर्माता हर्षा तायडे व इतर सर्व कलाकार सकाळी ११.३० वाजता राजवाड्यावर जिजाऊंचे दर्शन घेणार आहेत. त्यानंतर सकाळी दुपारी १२ वाजता अभिता ॲग्रो एक्स्पोच्या विचारमंचावर संपूर्ण सत्यशोधक टीमचा सिंदखेडराजा शहराच्यावतीने सामूहिक नागरी सत्कार केला जाणार आहे. तरी या सत्कार समारंभास नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पान १ वरून जिल्हाधिकारी महोदय जिल्ह्यातील भ्रष्टाचाऱ्यांवर...

तरीही अशा प्रकारच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात उशीर का होत आहे, हे न उलगडलेले कोडे आहे. दुसरीकडे महसूल आयुक्त कार्यालयातून प्राप्त झालेल्या आदेशानंतरही जर योग्य ती कारवाई करण्यात येत नसेल तर नक्कीच शंकेला निश्चितच वाव आहे, हे स्पष्ट होते. जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी महसूल उपायुक्तांच्या आदेशानंतरही टेकाळे असो किंवा तहसीलदार खंडारे असो कोणावरही कारवाई केलेली नाही. जिल्हाधिकारी पाटील असा कोणता अभ्यास करीत आहेत की, त्यांना ही कारवाई करायला एव्हढा वेळ लागतो आहे? आज टेकाळे असोत की खंडारे, या सर्वांच्या भ्रष्टाचारापासून जिल्हाधिकारी पाटील हे पूर्णपणे ज्ञात आहेत. या अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी आज जिल्हाधिकाऱ्यांकडे सज्जड पुरावे आहेत. पण तरीही कारवाई होत नसेल तर जिल्हाधिकारी पाटील यांचे हात कोणी बांधलेत, याचा उलगडा सर्वसामान्य नागरिकांसाठी होणे गरजेचे आहे. शिवाय टेकाळेंच्या बदलीसंदर्भात मॅटकडून जिल्हा प्रशासनाच्या विरोधात निकाल लागला आहे. त्यासंदर्भातही अद्याप कोणतीही हालचाल जिल्हाधिकाऱ्यांकडून दिसून येत नाही. दुसरीकडे जिल्हा रुग्णालय असो की जिल्हा स्त्री रुग्णालय सगळीकडे भ्रष्टाचार बोकाळला आहे. रुग्णालयातील भ्रष्टाचाराचा मुद्दा हा थेट विधानसभेपर्यंत दोन वेळा गाजलेले आहे. शिवाय अनेक राजकीय पुढारी व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी रुग्णालयातील करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाराविषयी आवाज उठवलेला आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज तर सातत्याने यासंदर्भात वृत्तमालिका प्रकाशित करून आंधळ्या-बहिऱ्या झालेल्या जिल्हा प्रशासनाला जागे करण्याचे काम करीत आहे. काही दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी जिल्हा रुग्णालयात जाऊन तेथील परिस्थितीचा आढावा घेतला होता. त्या ठिकाणी त्यांना मोठ्या प्रमाणात अव्यवस्था दिसून आली. परंतु त्यासंदर्भातही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. जिल्हा रुग्णालयात तर सध्या भ्रष्टाचार आणि अनागोंदी दोघेही हातात हात घालून नांदत आहेत. जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचाराचे कुरण बनले आहे. परंतु त्यासंदर्भातही योग्य ती ठोस कारवाई होताना दिसून येत नाही. येत्या काही दिवसांमध्ये जर जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी महसूलच्या आणि आरोग्य विभागाच्या भ्रष्टाचाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली नाही, तर निश्चित पाटील साहेबांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ कृती करून भ्रष्टाचाऱ्यांवर बडगा उगारावा, अशी अपेक्षा त्यांच्याकडून अनेक जण व्यक्त करीत आहेत. आता ही कारवाई होणार का, याचे उत्तर तर येणारा काळच देऊ शकतो, हे मात्र खरे.

अजून बरेच काही पुढील भागात...

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| 8x8 cm (Width 8 cm, Hight 8 cm) | 5x8 cm (Width 8 cm, Hight 5 cm) | 5x8 cm (Width 23 cm, Hight 5 cm) |
|---|---|---|
| 1 Month=5000/- | 1 Month=3500/- | 1 Month=3500/- |
| 15 Day=3500/- | 15 Day=2200/- | 15 Day=2200/- |
| 7 Day=2000/- | 7 Day=1500/- | 7 Day=1500/- |

**एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Width 12 cm, Hight 12 cm | Width 10 cm, Hight 8 cm | Width 8 cm, Hight 8 cm |
|---|---|---|
| 2600/- | 1800/- | 1300/- |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com